# भारतीय महाविद्यालय, अमरावती
# राष्ट्रीय सेवा योजना
# सर्व साधारण अहवाल
## सत्र २०१३-१४

**डॉ. अनिल श्री. खांडेकर**
कार्यक्रम अधिकारी
**प्रा. विद्या रा. पाथरकर**
महिला कार्यक्रम अधिकारी

महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या मनात सामाजिक जाणिव निर्माण करणे व त्यांचा सर्वांगिण विकास घडवून आणण्याच्या उद्देशाने राष्ट्रीय सेवा योजनेची स्थापना झाली.

स्वावलंबन, चारित्र्यवर्धन व सामाजिक बांधिलकी या मुल्यांचा समन्वय नविन शिक्षण पध्दतीत घडवून आणण्यासाठी महात्मा गांधी जन्म शताब्दी वर्षापासुन म्हणजे दि. २४ सप्टें १९६९ साली महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी राष्ट्रीय सेवा योजना भारत सरकारच्या युवा कल्याण व क्रिडा मंत्रालय अंतर्गत राबविण्यात येतो. महात्मा गांधींच्या विचारांना रुजविण्यासाठी पंडीत जवाहरलाल नेहरुचे स्वप्न साकार करण्यासाठी ही योजना राज्य सरकारच्या सहकार्याने राबविण्यात येत असून सध्या देशातील १८०विद्यापीठातील ८ हजार महाविद्यालयातील २२ लाखाहून अधिक विद्यार्थी सहभागी आहेत. राष्ट्रीय सेवा योजनेची चळवळ सतत असून अष्टोप्रहर कार्य सुरु असते.

भारतीय महाविद्यालयाचे सुवर्ण महोत्सवी वर्ष असून २०१३-१४ या सत्रात हरितपर्व २०१३ या संकल्पनेतून विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. पथनाट्य, दिंडी, वृक्षारोपण तसेच दत्तक ग्रामात शिबीराच्या माध्यमातून पर्यावरण, दिंडी, पथनाट्य, अंधश्रध्दा निर्मुलन तसेच शिवाजी हायस्कुल भानखेड येथे परिसर स्वच्छ करुन सौदर्यांकरण करुन वृक्षारोपण केले.

महाविद्यालयात २०१३-१४ या शैक्षणिक सत्रात पुढील कार्यक्रम राबविण्यात आले. त्या सत्रातील नोंदी पुढीलप्रमाणे -

### १) श्री विठ्ठल रुख्मिणी मंदीर परिसरात वृक्षारोपण :

दि. ६ जुलै २०१३ रोजी हरित वर्ष - २०१३ या संकल्पनेतून श्री विठ्ठल रुख्मिणी मंदीराच्या परिसरात भारतीय महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ए. जे. गादेवार यांनी वृक्षारोपण केले. एक झाड एक विद्यार्थी

या संकल्पनेतून या अभियानाला प्रारंभ झाला. मंदीराचे अध्यक्ष श्री. वा.म. बोके व संस्थेचे पदाधिकारी उपस्थित होते. स्त्युत्य उपक्रम राबविल्याने प्राचार्य डॉ. ए. जे. गादेवार याचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाला राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. अनिल खांडेकर, महिला कार्यक्रम अधिकारी प्रा. विद्या पाथरकर रासेयोचे माजी कार्यक्रम अधिकारी प्रा. नितिन तट्टे, प्रा. शर्मिष्ठा कुळकर्णी, गायत्री चवाळे उपस्थित होते. स्वयंसेवकांनी उस्फुर्त कार्यक्रम पार पाडला.

**२) गुरुपुर्णिमा व गुणवंत विद्यार्थ्यांचा कार्यक्रम :**

दि. २२ जुलै २०१३ रोजी गुरु पुर्णिमेचे औचित्य साधुन गुरुजनाचा सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा. भुयारकर होते. बी. कॉम. ला चांगल्या गुणानुक्रमे उत्तीर्ण होणारा विद्यार्थ्यांचा सत्कार घेण्यात आला. प्रतिक गाडे, स्वप्नील दाहे, चेतन इंगळे या विद्यार्थ्यांना बक्षिस वितरीत करण्यात आले. त्या प्रसंगी प्रा. गजभिये, डॉ. रघुवंशी, प्रा. कुळकर्णी, प्रा. तट्टे, प्रा. चवाळे तसेच रासेयोचे कार्यक्रम अधिकारी डॉ. अनिल खांडेकर, महिला कार्यक्रम अधिकारी प्रा. विद्या पाथरकर उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन निलेश करंडे व आभार प्रदर्शन वजीर लुचईवाले यांनी केले.

**३) पर्यावरणाचे महत्व व जनजागृती :**

दि. ३० जुलै २०१३ रोजी प्राणीशास्त्र विभाग व राष्ट्रीय सेवा योजनेच्या संयुक्त विद्यमाने निसर्ग संवर्धन संस्थेच्या माध्यमातून 'पर्यावरण महत्व व जनजागृती' या विषयावर मार्गदर्शन करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. ए. जे. गादेवार होते. तर वक्ते श्री. अव्दैत केवले व गोपाल मालवानी होते. कार्यक्रमाला राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. अनिल खांडेकर, महिला कार्यक्रम अधिकारी प्रा. विद्या पाथरकर, प्राणीशास्त्र विभागाच्या विभाग प्रमुख डॉ. दिपलक्ष्मी कुळकर्णी व्यासपीठावर होते. कार्यक्रमाचे प्रास्तविक प्राणीशास्त्र विभागाच्या विभाग प्रमुख डॉ. दिपलक्ष्मी कुळकर्णी यांनी केले. स्वागतगीत कु. कांचन बानाईत तर कार्यक्रमाचे संचालन कु. वैष्णवी चौधरी व आभार प्रदर्शन कु. अश्विनी पागरुत हिने केले. कार्यक्रमाला प्रा. शर्मिष्ठा कुळकर्णी, प्रा. संगिता देशमुख, प्रा. सोनवणे व प्रा. आम्रपाली वासनिक उपस्थित होत्या.

**४) स्वच्छता अभियान :**

दि. ९ ऑगस्ट २०१३ क्रांतीदिनाचे औचित्य साधून परिसर स्वच्छता व आरोग्य जनजागृती अभियान आयोजन करण्यात आले. कार्यक्रमांतर्गत संपूर्ण परिसरातील स्वच्छता, गांजर गवत, साचलेले

डबके त्यामुळे डासांची उत्पत्ती मोठ्या प्रमाणावर झाली. या सत्रात दमदार पावसामुळे गवत, साचणारे डबके, गांजर गवत, अस्थवस्थ झाडांच्या फांदया वाढल्यामुळे स्वयंसेवकांनी मोहीम हाती घेतली. त्यावेळी प्राचार्य डॉ. ए. जे. गादेवार यांनी स्वयंसेवकांशी हितगुज केले व प्रत्यक्ष पाहणी केली.

**५) पर्यावरण जागृती स्वाक्षरी अभियान :**

दि. १५ ऑगस्ट २०१३ रोजी स्वातंत्र्य दिनाच्या पर्वावर पर्यावरण जागृती स्वाक्षरी अभियान राबविण्यात आले. हरितपर्व २०१३ या संकल्पनेतून ही स्वाक्षरी अभियानाचे आयोजन करण्यात आले. ध्वजारोहण नंतर प्राचार्य डॉ. ए. जे. गादेवार यांच्या हस्ते स्वाक्षरी अभियानाला सुरुवात झाली. महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी वर्ग उपस्थित होते.

**६) पथनाट्यातून जनजागृती :**

दि. २१ ऑगस्ट २०१३ सद्‌भावना पंधरवाडा सामाजिक ऐक्य व सामाजिक बांधिलकी लक्षात घेवून रासेयोच्या स्वयंसेवकांनी राजापेठ मुख्य चौकात पथनाट्य केले. न्याय व्यवस्था, पर्यावरण, सामाजिक ऐक्य, झाडे लावा, झाडे जगवा विविध विषयांवर स्वयंसेवकांनी आपली कला सादर केली. रहदारीतील जन माणूस विद्यार्थ्यांची कला लक्ष वेधून घेत होता. डॉ. ए. जे. गादेवार यांनी विद्यार्थ्यांना कौतुक करुन बक्षिस दिले.

**७) रक्त गट चाचणी परिक्षण :**

दि. २३ ऑगस्ट २०१३ सामाजिक ऐक्य, सामाजिक बांधिलकी व सामाजिक सद्‌भावना लक्षात घेवून क्लिनिकल लॅब टेक्नॉलॉजी व रासेयोच्या संयुक्त उपक्रम महाविद्यालयात रक्त गट चाचणी परिक्षण घेतले. प्राणीशास्त्र विभागाचे विभाग प्रमुख क्लिनिकल लॅब टेक्नॉलॉजीचे समन्वयक डॉ. दिपलक्ष्मी कुळकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली स्त्युत्य उपक्रम पार पडला. प्राचार्य डॉ. ए. जे. गादेवार यांनी स्व. राजीव गांधी यांच्या प्रतिमेस पुष्पमाला अर्पण केली. त्यावेळी रासेयोचे सल्लागार समितीचे सदस्य डॉ. सुभाष गवई उपस्थित होते. प्राध्यापक व विद्यार्थ्यांनी उत्तम प्रतिसाद दिला.

**८) सद्‌भावना प्रतिज्ञा :**

दि. १ सप्टे. २०१३ रोजी स्व. राजीव गांधी व सद्‌भावना पंधरवाड्यात महाविद्यालयातून दिंडीचे आयोजन केले. अहिंसा, जनजागृती, सामाजिक ऐक्य यावर दिंडी बजरंग टेकडी परिसरातून विविध घोषणा दिल्या आणि एकमेकांविषयी भावना वृध्दीगंत केल्या.

**९) शिक्षक दिनाच्या पर्वावर शिक्षकांचा सत्कार – दि. ७ सप्टे. २०१३**

दि. ५ सप्टे. शिक्षक दिनाचे औच्यीत्य साधून सामाजिक, शैक्षणिक विविध पदांवर समर्थपणे धुरा हाताळणारी मंडळीचा या दिनी सत्कार करण्यात आला. अध्यक्षस्थानी प्रा. रामरावजी बिजवे, प्राचार्य डॉ. ए. जे. गादेवार उपस्थित होते. मान्यवरात सहसंचालक उच्च शिक्षण डॉ. डोंगरदिवे, डॉ. प्रविण रघुवंशी, प्रा. संजय आसोले, डॉ. अजय देशमुख, परिक्षा नियंत्रण डॉ. वडते, डॉ. श्रीकांत पाटील होते. प्रास्तविक प्रा. रवि वैद्य यांनी केले. संचालन प्रा. नितिन तट्टे व आभार प्रदर्शन सुशिल गावंडे यांनी केले.

**१०) स्वच्छता व निबंध स्पर्धा : (दि. २५ सप्टे. ते ०२ ऑक्टो. २०१३ रासेयो सप्ताह) :**

सुयोग प्राथमिक शाळा येथे रासेयो सप्ताहाच्या निमित्याने शाळेच्या परिसरातील स्वच्छता स्वयंसेवकांनी केली. विद्यार्थ्यांसाठी निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. उत्कृष्ट निबंध लिहण्यात आलेल्या विद्यार्थ्यांना बक्षिस व प्रोत्साहनपर बक्षिस वितरीत करण्यात आले. सुयोग प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. शिरभाते मॅडम व शिक्षिका व कर्मचारी वर्ग उपस्थित होत्या.

श्री. राजाभाऊ पिदडी व सौ. ज्योत्स्ना शेटे शिक्षिका व सामाजिक कार्यकर्त्या यांनी दि. २९ सप्टे. २०१३ रोजी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. रासेयोचे महत्व जीवनाकडे पाहण्याचा दृष्टीकोन तसेच मोबाईल दुष्परिणाम याबाबत विद्यार्थ्यांना महत्व विशद केले.

डॉ. बबीता येवले यांनी महात्मा गांधी जयंती व लाल बहादूर शास्त्री जयंतीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांशी रासेयो सप्ताहाच्या माध्यमातून सुसंवाद साधला दोन्ही महापुरुषाच्या जीवनांवर प्रकाश टाकला.

**११) स्पर्धा परिक्षेवर मार्गदर्शन :**

युनिक ॲकेडॅमिकचे प्रा. अमोल पाटील यांनी दि. १९ ऑक्टो. २०१३ रोजी स्पर्धा परिक्षेवर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. स्पर्धा परिक्षा व तंत्र मंत्र या विषयांवर सकाळच्या वतीने कार्यक्रम आयोजित करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. गादेवार, सकाळचे वितरक हुकुमचंद माने, डॉ. सुभाष गवई, प्रा. नितिन तट्टे, प्रा. ताकसांडे, प्रा. बोरडे, प्रा. जसवंते उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन व आभार प्रदर्शन राहुल यादगिरे यांनी केले.

**१२) गाडगे बाबा पुण्यतिथी स्वच्छता अभियान :**

गाडगे बाबा पुण्यतिथी स्वच्छता अभियान दि. २० डिसें. २०१३ रोजी घेण्यात आले. संपूर्ण महाविद्यालयाच्या परिसरातील स्वच्छता करण्यात आली. त्यावेळी प्राणीशास्त्र विभागाच्या विभाग प्रमुख

डॉ. दिपलक्ष्मी कुळकर्णी, डॉ. दंवडे, प्रा. वासनिक, प्रा. गवई, प्रा. दया पांडे, प्रा. गजभिये उपस्थित होते. प्राचार्य डॉ. गादेवार यांनी परिसराची पाहणी केली.

दि. २१ डिसें. २०१३ रोजी शनिवारी समाजशास्त्र विभागाच्या विभाग प्रमुख डॉ. दया पांडे यांचे गाडगे बाबा व त्यांचे शैक्षणिक विचार यावर मार्गदर्शन झाले.

**१३) एड्सवर जनजागृती व मार्गदर्शन :**

दि. २४ डिसें. २०१३ रोजी एड्सवर जनजागृती व मार्गदर्शन महाविद्यालयाच्या परिसरात स्वयंसेवकांना दिले. कार्यक्रमाला शासकिय रुग्णालयाचे श्री. अजय साखरे जिल्हा कार्यक्रम अधिकारी होते. तर अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. ए. जे. गादेवार होते. पोस्टर प्रदर्शनीचे उद्घाटन केले. त्यानंतर मार्गदर्शन करुन प्रजासत्ताक दिनी ट्रक हायव्हरला परिपत्रके वाटली व रॅली काढली.

**१४) राज्यस्तरीय सांस्कृतिक स्पर्धेत सहभाग :**

राज्यस्तरीय सामाजिक - सांस्कृतिक स्पर्धा - उत्कर्ष - २०१३ साठी आरती दिलीप धनुष्कर दि १४ ते १६ डिसें २०१३ या कालावधीत सहभाग घेतला.

**प्रा. डॉ. अनिल श्री. खांडेकर**
कार्यक्रम अधिकारी

**प्रा. विद्या रा. पाथरकर**
महिला कार्यक्रम अधिकारी

**प्रा. निलेश कडू**
सहकार्यक्रम अधिकारी

**प्रा. स्नेहा जोशी**
सहकार्यक्रम अधिकारी

**प्रा. गायत्री चवाळे**
सहकार्यक्रम अधिकारी